
थरार... हरिश्चंद्राच्या
उजव्या नाळेचा
लेखक:
संकल्प चौधरी

पुस्तकाचे नाव : थरार... हरिश्चंद्राच्या उजव्या नाळेचा.

प्रकार : ट्रेक प्रवास वर्णन.

लेखक : संकल्प चौधरी ( sanky.f1@gmail.com )

छायाचित्रे : संकल्प चौधरी, पंकज वाडेकर, रवींद्र निगम.

मुखपृष्ठ छायाचित्र : तरुण व्यास.


नकाशा सौजन्य : trekshitiz.com

**प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान.**

**प्रकाशन दिनांक : पाडवा, चैत्र शुक्ल प्रतिपदा, शके १९३६ ,**
**३१ मार्च २०१४**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई-पुस्तक वेबसाइटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर अथवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©



# अर्पणपत्रिका

सदर पुस्तकात नमूद केलेल्या route चा


३० वर्षांपूर्वी सर्वप्रथम शोध लावणाऱ्या

महाराष्ट्राच्या हिऱ्याला ( श्री. विरेन्द्र पंडित यांना )

हे पुस्तक सादर अर्पण...

संकल्प चौधरी

# हरीश्चंद्र गड


कोतुळ
उ
सप्ततिर्थ
झेलाची घुम्टी
केदार लिंग
पाचनई
हरिश्चंद्रेश्वर मंदिर
विश्वामित्र मंदिर
गणेश गुहा
साधले घाट
नळीची वाट
कोकण कडा
टोलारखिंड
वाघशिल्प
खिरेश्वर
वालेकिल्ला
नेद
गोमुख
शिवलिंग
तारामती शिखर
रोहिदास शिखर
बेलपाड्याहून

## गडाची माहिती व इतिहास:

किल्ल्याची ऊंची : ४000 फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: माळशेज

जिल्हा : नगर

श्रेणी : मध्यम

**हरिश्चंद्रगड म्हणजे नगर जिल्ह्याचे महाबळेश्वरच !!**

महाराष्ट्रातील सुंदर घाटांपैकी एक असलेल्या माळशेज घाटाच्या डाव्या बाजूस हा अजस्त्र पर्वत उभा आहे. चहुबाजूंनी तुटलेल्या रौद्रभीषण कडेकपारींनी नैसर्गिक संरक्षण लाभलेला हा गड ठाणे, पुणे आणि नगर जिल्ह्यांच्या सीमेवर आहे.

इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे यास मोगल आणि मराठे यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहेच, परंतु यासोबतच सुमारे चार हजार वर्षांपूर्वीची पौराणिक पाश्वर्भूमी लाभली आहे.

हरिश्चंद्रगडाचा उल्लेख प्राचीन अग्नीपुराणात व मत्स्यपुराणात आढळतो. १७४७-४८ मध्ये हा किल्ला मराठ्यांनी मोगलांकडून घेतला आणि किल्लेदार म्हणून कृष्णाजी शिंदे यांची नियुक्ती केली.




वाल्हिवरे गावातून हरिश्चंद्रगड.....

## पाहाण्याची ठिकाणे :

### ❖ हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर :

मंदिराची उंची साधारणत: सोळा मीटर आहे. मंदिराच्या प्रांगणात प्राकाराची भिंत आहे. या प्राकाराच्या भिंतीसमोरच एक दगडी पूल आहे. या पुलाच्या खालून एक ओढा तारामती शिखरावरून वाहत येतो यालाच “मंगळगंगेचा उगम” असेही म्हणतात. पुढे ही नदी पायथ्याच्या पाचनई गावातून वाहत जाते.

मंदिराच्या आवारात अनेक गुहा आहेत. काही गुहा रहाण्यासाठी योग्य आहेत, तर काही गुहांमध्ये पाणी आहे. या गुहांमधील पाणी थंडगार व अमृततुल्य आहे. मंदिराच्या मागे असणाऱ्या गुहेमध्ये एक चौथरा आहे. या चौथऱ्यात जमिनी खाली एक खोली आहे, यावर प्रचंड शिळा ठेवली आहे. या खोलीत ‘चांगदेव ऋषींनी’ चौदाशे वर्ष तप केलं होते अशी स्थानिक गावकऱ्यांची श्रध्दा आहे.


© Sankalp Chaudhari

‘शके चौतिसे बारा । परिधावी संवत्सरा । मार्गशिर

तीज (तेरज) रविवार । नाम संख्य ।।

हरिश्चंद्रनाम पर्वतु । तेथ महादेव भक्तु ।

सुरसिध्द गणी विरुयातु । सेविजे जो ।। हरिश्चंद्र देवता ।।

मंगळगंगा सरिता ।सर्वतीर्थ पुरविता सप्तस्थान ।

ब्रम्हस्थळ ब्रम्ह न संडीतु । चंचळ वृक्षु अनंतु ।

लिंगी जगन्नाथु ।महादेओ ।।

जोतीर्थासि तीर्थ । केदारांसि तुकिनाति ।

आणि क्षेत्री निर्मातिबंधु हा।। ‘

हे चांगदेवा विषयीचे लेख मंदिराच्या प्राकारात, खांबांवर, भिंतींवर आढळतात. श्री चांगदेवांनी येथे तपश्चर्या करून ’तत्वसार’ नावाचा ग्रंथ लिहिला.

मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरच एक छोटे मंदिर आहे. यातही महादेवाची पिंड आहे. या छोट्या मंदिरासमोरच एक भग्न अवस्थेतील मूर्ती आहेत. त्यातील पाषाणावर राजा हरिश्चंद्र डोंबाऱ्यांच्या घरी कावडीने पाणी भरत असलेला प्रसंग चित्रित केला आहे.



## ❖ केदारेश्वराची गुहा :

मंगळगंगेच्या प्रवाहाच्या दिशेने गेल्यावर डाव्या हातास एक गुहा लागते, यालाच केदारेश्वराची गुहा असेही म्हणतात. या गुहेत १ मीटर उंच आणि २ मीटर लांब असे शिवलिंग आहे. यात कंबरभर पाणी आहे. ही गुहा खरंतर चार खांबांवर तोलली होती, पण सद्यस्थितीला एकच खांब शाबूत आहे.



याच गुहेत एक खोली ही आहे .खोलीच्या डाव्या हाताच्या भिंतीवर शिवपूजनाचा प्रसंग कोरलेला आहे. या शिवलिंगाला प्रदक्षिणा घालावयाची असल्यास बर्फतुल्य पाण्यातून जावे लागते.



## ❖ कोकणकडा :

**हरिश्चंद्रगडावरील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे कोकणकडा.** अर्धगोल आकाराचा, अर्ध्या किलोमीटर परिघाचा, काळाकभिन्न रौद्रभीषण कोकणकडा हा एकमेवाद्वितीय असावा. कड्याची सरळधार १८०० फूट भरेल. पायथ्यापासून कड्याची उंची साधारणत□ ४५०० फूट भरते. संध्याकाळच्या वेळी सूर्यास्ताचा नयनरम्य सोहळा या कड्यावरून पहाण्यात जो आनंद आहे तो अवर्णनीयच आहे.




© Sankalp Chaudhari

## ❖ तारामती शिखर :

तारामती शिखर गडावरील सर्वात उंच शिखर आहे. याची उंची साधारणत: ४८५० फूट आहे. शिखराच्या पोटात एकूण सात लेणी आहेत. त्यापैकी एका गुंफेत गणेशाची सुमारे साडेआठ फूटाची भव्य आणि सुंदरमूर्ती आहे.याच गणेश गुहेच्या आजुबाजूला अनेक गुहा आहेत. यातही राहण्याची सोय होते. गुहेच्या समोर उभे राहिल्यावर डावीकडे जाऊन पुढे वर जाणारी वाट आपल्याला अर्ध्या तासाच्या चढाइनंतर तारामती शिखरावर घेऊन जाते. माथ्यावर दोन ते तीन शिवलिंग आढळतात.



## थरारवर्णन:

मित्रहो दिनांक १४ ते १६ मार्च २०१४ मध्ये रोहिदास शिखर व कोकणकडा यामधील उजव्या नाळेतून केलेल्या हरिश्चंद्रगडच्या या थरारक ट्रेक नंतर या प्रवासवर्णनास थरारवर्णन म्हणणेच जास्त योग्य ठरेल  असे मला वाटते.

तर......दिनांक २४  नोव्हेंबर २०१३, नुकताच  मी हरिश्चंद्रगड नळीच्या वाटेने करून आलेलो असल्याने अंगावर मूठभर मांस चढल्यासारखे वाटत होते. हरिश्चंद्रगड तो पण नळीच्या वाटेने म्हणजे अगदी दुग्धशर्करा योग जमून आल्यासारखे.......!!!!

यामुळे माझं विमान ढगात उडत होतं आणि माझ्या मित्रांपैकी ज्यांनी ज्यांनी हा ट्रेक miss केला होता त्यांच्यासमोर फुशारक्या मारण्याचे कार्यक्रम अगदी “ फुरसत मध्ये ”  सुरू होते.

पण आठवडाही उलटत नाही तो facebook वर बसलो असताना मित्राचे उजव्या नळीने केलेल्या ट्रेकचे फोटो नजरेस आले आणि सर्वात कठीण वाटेने हरिश्चंद्रगड केल्याचा माझा भ्रमाचा भोपळा फुगा फुटावा तसा फटकन फुटला.

तरुणचे फोटो बघता बघताच मनाशी ठरवलं की, ही वाट करून इथला अनुभव गाठीशी घ्यायचा.

मग काय..........माझे नवीन लक्ष्य मला खुणावत होते. हरिश्चंद्रगड जणू माझ्यातल्या ट्रेकरला आव्हान देत होता की " **ये आणि माझ्या या रांगड्या नाळा पार करत गड सर करून दाखव" !!!!!!**

या नवीन route ची  जास्तीत जास्त माहिती शक्य त्या मार्गाने गोळा करण्याचा सपाटाच सुरू केला. या कामी मला माझा मित्र तरुण व्यास याची खूप मदत झाली.

ट्रेकच्या आधीचा आठवडा रोपची व्यवस्था करणे, तरुणने दिलेला नकाशा (route map) आणि फोटो यांचा अभ्यास करण्यातच गेला. माझ्या एका शब्दावर लगेच रोपची व्यवस्था करून देणारे माझे  ऑफिस मधील सहकारी श्री. विनय गोखले यांचेही मी मन:पूर्वक आभार  मानू  इच्छितो.

## दिनांक १४ मार्च २०१४

संध्याकाळी ४:०० च्या सुमारास पुण्याच्या मंडळींना फोन करून पुन्हा एकदा सगळा प्लॅन समजावून सांगितला. ऑफिस सुटल्यावर तडक घरी आलो आणि  ब्याग पॅक केली.

बॅगेला लटकवलेली कॅरीमॅट, कमरेला पाऊच आणि हातात १२० फूटी रोप असा सगळा जामानिमा घेऊन रात्री ९ वाजता दादर स्टेशनला पोचलो. माझ्या या सगळ्या अवतारामुळे  मी गर्दीतला कुतुहलाचा विषय होऊन बसलो होतो.

कल्याणसाठी फास्ट लोकलची वाट बघत न बसता लातूर एक्सप्रेस मध्ये घुसलो आणि १०च्या सुमारास कल्याणला उतरलो. पुण्याची मंडळी आधीच यष्टी ष्ट्याण्ड वर पोचलेली त्यामुळे मी देखील मोर्चा तिकडेच वळवला.

एकमेकांची ओळख होईपर्यंत आमची एसटी आलीसुद्धा. गर्दीतून घुसण्यात काहीच अर्थ नसल्याने खिडकीतून बॅगा आत टाकून जागा अडवल्या आणि शांतपणे एसटीत जाऊन बसलो.

खरतर हरिश्चंद्र करण्याची ही माझी चौथी खेप, पण प्रत्येक वेळी गड करताना मनाला लागणारी ओढ, उत्सुकता सर्वस्वी नवीनच वाटते. **एसटी मध्ये बसल्या बसल्या मन केव्हाच गडावर जाऊन पोहोचलेल, आता फक्त शरीराला तिकडे घेऊन जायच होत !!!**

**दिनांक १५ मार्च २०१४**

एसटीतून डुलक्या काढत रात्री १२:00 च्या सुमारास आम्ही चौघे माळशेज घाटाच्या अलीकडील मोरोशी या गावात उतरलो. मोरोशी गावामधून एक रस्ता बेलपाडा (वाल्हिवरे) गावात जातो, हे अंतर सुमारे १०-११ किमी आहे.

चतुर्दशी असल्याने चांदण्याचा प्रकाश सर्व दरीभर फाकला होता. चंदेरी प्रकाशात न्हाऊन निघल्याने सह्याद्रीची शिखरे अधिकच मोहक वाटत होती. अशा चांदण्यात सह्याद्रीत भटकण्याची मजा काही औरच असते..........!!!

रात्री ३:०० च्या आसपास आम्ही आमचा ११ किमीचा मॉर्निंग वॉक संपवून बेलपाड्याला पोचलो आणि आमच्या ओळखीचे गावातले गाइड श्री. कम्मा पोकळा यांच्याकडे मुक्काम केला.




कम्माच्या घरातून हरिश्चंद्रगडाचे प्रथमदर्शन.....

सकाळी ६:०० वाजता डोळे उघडले, सुरवातीलाच उशीर नको म्हणून बाकी सर्वांना उठवले. कम्माकडून पुन्हा एकदा वाटेचा तपशील, खाणाखुणा जाणून घेतल्या.

सकाळची नित्यकर्म आटपून न्याहरीची वाट पाहेपर्यंत घरात बागडणाऱ्या चिमुरड्यांचे फोटो घेतले.


© SANKALP CHAUDHARI


© SANKALP CHAUDHARI


© SANKALP CHAUDHARI

फोटूग्राफी होईपर्यंत नाश्ता पण तयार झाला, वहिनीने बनवलेल्या गरमागरम भाकऱ्या (तांदूळ/नागली...??) आणि पिठलं म्हणजे अगदीच फर्मास......!!!

नाश्ता आटोपून ७:३० वाजता आम्ही आमच्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि खडतर अशा ट्रेकला सुरुवात केली.




रोहिदास शिखरामागून पसरलेली प्रभा.....

उजव्या हाताला रोहिदास व माळशेज, डावीकडे नापट्याचा डोंगर आणि समोर उभा ठाकलेला रौद्रभीषण कोकणकडा !!!!! **एकूणच काय तर “ Stage was completly set for our wildest dream ”**




गावातून जंगलात जाताना बरेच ठिकाणी सरपणासाठी लाकूडतोड केलेली दिसत होती त्यामुळे जंगल उघड-बोडकं वाटत होत.


© Sankalp Chaudhari
STANDING TALL IN FRONT OF MIGHTY WALL

नळीकडे जाताना वाटेत आमच्या आधी निघालेला ग्रुप भेटला, तो ग्रुप regular डाव्या नळीने गड करणार होते.

त्यांनी ग्रुप मेंबरचा वाढदिवस कलिंगड कापून साजरा केल्याने आम्हाला पण एक एक कालिंगडची फोड खायला मिळाली.......यामुळे खुश होऊन आम्ही त्यांचे नामकरण “ कलिंगड ग्रुप ” असे करून टाकले.

मजल-दरमजल करत आम्ही उजव्या नाळेच्या तोंडाच्या जवळ येऊन पोहोचलो. येथून आमच्यासोबत आलेला कम्माचा मुलगा परत फिरणार होता. पुढे निघायच्या आधी त्याच्या हातावर २०० रुपये टेकवले......तो पण खुश !!!!!!

पुढे पाच मिनिटेपण चाललो नसू तो  आम्ही नळीच्या starting point वर येऊन पोचलो.

जी नळी करण्यासाठी इतकी मेहनत घेतली ती आमच्या समोर होती. तिच्या प्रथमदर्शनानेच भान हरपून बसलो, तिचं रांगड सौंदर्य मला लोभसवाणं भासत होत.




उजव्या नळीचे प्रथम दर्शन.....



© SANKALP CHAUDHARI

नेहमीची नाळ मागच्या बाजूला ठेवून आम्ही या उजव्या नाळेने चढाई करण्यास सुरुवात केली. मोठमोठ्या दगड धोंड्यातून वाट काढत, धडपडत, ठेचकाळत आम्ही मार्गक्रमण करू लागलो.



कलिंगड ग्रुप तोवर विरुद्ध नळीत येऊन दाखल झाला होता. या वाटेनी चढाई करताना एक लक्षात आले की या नळीत सूर्यप्रकाश जास्त वेळ पडत नाही कदाचित याच कारणामुळे या नळीत Loose Rocks खूप कमी आढळले.

थोडं पुढे गेल्यावर एक अजस्त्र खडक आम्हाला दिसला. या दगडाला पाहून मला एकदम सुपरमॅनचा लोगो आठवला.




© SANKALP CHAUDHARI


© Sankalp Chaudhari


© SANKALP CHAUDHARI


© Sankalp Chaudhari

सुपरमॅन रॉक पार करून गेल्यावर मात्र नळीचा चढ एकदम तीव्र झाला व तो पार करताना सगळ्यांची चांगलीच दमछाक झाली.




नळीमधला तीव्र चढ.....

नजर फिरवून पहिलं तर हरिश्चंद्रचे ओबडधोबड , बेलाग कडे आणि त्या कड्यांना चिरत जाणारी नळी स्पष्टपणे दिसत होती. त्या नळीतून जाणाऱ्या कलिंगड ग्रुपचे सदस्य आता एखाद्या ठिपक्यासारखे दिसत होते.

**निसर्ग जणू आम्हाला आमच्या खुजेपणाचं संदर्भासहित स्पष्टीकरण देत होता.**


यापुढे आला तो कसोटीचा क्षण, आमच्या समोर होता सुमारे ४० फूट उंचीचा कातळकडा (Rock Patch). त्याला पाहून " हा pacth आपल्याला जमेल ना..?? " अशी शंकेची पाल क्षणभर मनात चुकचुकली, पण ते केवळ क्षणभरच !!!!!!

दुसऱ्याच क्षणी भावनांना आवर घातला आणि मन सिद्ध केलं कातळकड्याशी भिडण्याकरता.......पुढे काय होणार याची अजिबात कल्पना नव्हती !!!!!


© SANKALP CHAUDHARI

कड्याखाली फोटोग्राफीसाठी चांगला पॉइंट असल्याने अमोल आणि पंकज वेगवेगळ्या pose मध्ये फोटो काढण्यात मग्न झालेले, त्यांच्या मागे काय चाललाय याच्याशी त्यांच काही सोयरसुतक नाही असच त्याक्षणी वाटत होतं.

इकडे मागे मी आणि गौतम कडा चढण्याची तयारी करत होतो. सरतेशेवटी मनातल्यामनात देवाच नाव घेतलं आणि कड्यावरचा पहिला Attempt सुरू केला.





कड्यावरच्या दोन खोबणीपैकी पहिल्या खोबणी पर्यन्त बिनबोभाट आलो, पण येथून पुढे कातळ तिरका असल्यामुळे आणि पकडायला grip मिळत नसल्याने  पुढे जाणे कठीण वाटत होते.

मी अडकल्याच पाहून गौतम खालून पहिल्या खोबणी पर्यन्त आला. त्यानेसुद्धा तिरक्या कातळवरून वर जाण्याचा निष्फळ प्रयत्न करून पहिला. यामुळे आम्ही कातळ आणि उजवीकडील भिंतीच्या सहाय्याने वर जाता येतय का ?? हे पाहू लागलो.



अवकाळी पावसामुळे कातळ जरा ओलाच होता. बूट सरकत असल्याने आम्ही अनवाणीच कडा चढू लागलो. २-३ attempts नंतर गौतम वरच्या खोबणीत जाऊन पोहोचला. माझ्या पायात cramps यायला लागल्याने मी जरा वेळ तिकडेच बसलो.

तोपर्यंत पंकज सुद्धा वरच्या खोबणीत जाऊन बसला,पण यापुढे दोघांचीही गाडी अडली.



शेवटी मी सुद्धा अनवाणी कडा चढायला लागलो. अमोलला बॅगा वर पाठवण्यासाठी खालीच थांबवलेल. हळू हळू तोल सावरत मी दुसऱ्या खोबणीत जाऊन पोचलो. एव्हाना आम्ही साधारण ३० फूट चढाई केली होती.

यापुढील चढाई जरा tricky होती दगड बाहेर आल्यामुळे वर कुठे पकडायचे हे दिसत नव्हते. १-२ वेळा प्रयत्न करून कातळाचा अंदाज घेतला पण पुढचा मार्ग खडतर भासत होता.

कडा पूर्ण होण्याची चिन्ह दिसत नव्हती, मगाशी मनात आलेली शंका खरी ठरतेय की काय असं वाटायला लागला.

शेवटी मनाचा हिय्या करून अजून एक attempt सुरू केला. यावेळी जमेल तसा कातळाचा आधार घेत वर गेलो. **मध्येच एके ठिकाणी खाली पडतो की काय..!!** अशी भीती मनात दाटली पण तिच्यावर मात करत अखेर पावणेदोन तास प्रयत्न करून कडा पार केलाच.


कातळकडा पार केल्यावर वरुन
घेतलेला कड्याचा फोटो.....

वरती पोचल्यावर  पाहतो तर rope लावायला कुठेच जागा नव्हती त्यामुळे शेवटी स्वत:भोवतीच rope गुंडाळून मोकळे छेडे खाली सोडले. खालच्या तिघांपैकी गौतम बऱ्यापैकी cliamb करणारा असल्याने प्रथम  त्याला वर घेतले.

आता मी आणि गौतम दोघेही rope पकडून सज्ज झालो. पंकजने वर याला सुरवात केली, पण त्याला काही नीट वर येणे जमत नव्हते. या सगळयात तो ३ वेळा धडपडला आणि पूर्ण वजन rope वर येत असल्याने आमच्या मनगटांची वाट लागली.....(अजूनही दुखतायत मनगटे !!!!) **पंकज जणू सांधणच्या giant swing ची भूक इकडे झोका घेऊन भागवत होता.**

पंकज वर आल्यावर पटापट बॅगा वर घेतल्या आणि अमोलला पण त्याच वेगात खेचून घेतल. **Height म्हणजे मी आणि गौतम वर मेहनत करत असताना हा खालून आम्हाला बिस्किट दाखवून विचारतो “ हवयं का म्हणून ??? ”**


© Sankalp Chaudhari


© Sankalp Chaudhari

यापुढे साधारण १० मिनिटांच्या चढाई नंतर आम्ही नळीच्या टोकावर जाऊन पोचलो तिकडून शेंडी सुळक्याचे भीषण दर्शन होत होते. मागील वेळेस विरुद्ध नळीतून ट्रेक करताना मला हा सुळका खूप छोटा दिसत होता, परंतु तोच सुळका जवळून पाहिल्यावर छाती दडपून गेली.




शेंडी सुळका.....


© SANKALP CHAUDHARI

या ठिकाणी येईपर्यंत दुपारचे १२:३० वाजले. तिकडेच रोहिदासच्या कड्याच्या सावलीत बसून जेवण उरकले. फोनला नेटवर्क असल्याने पुन्हा एकदा कम्मा कडून रस्त्याची माहिती घेतली.

अमोलने आदल्या नळीत प्रताप दाखवत आमचा पाण्याचा भार खुपसा हलका केला होता. पण अजून रस्ता बराच बाकी होता आणि त्यात दुसरी नळीसुद्धा बाकी होती. पाणी संपण्याची चिन्ह दिसत होती. आम्ही आमचं टॉनिक AKA Glucon-D घेत घेत वेळ मारून नेत होतो.

या पॉइंट वरून घाट आणि कोकण याचे सुरेख दर्शन होते. माळशेज घाट, सिंदोळा, कारकाईचा डोंगर, MTDC हॉटेल , काळू नदीचा धबधबा, रेठीचा झुरा, पिंपळगाव-जोगे धरण, तिवई डोंगर व त्याचे २ सुळके, वराढ्याचा डोंगर आणि दूरवर हडसर किल्ला असा विस्तीर्ण प्रदेश दृष्टीपथास पडतो.


© Sankalp Chaudhari

थोडा वेळ आराम करून १:०० वाजण्याच्या सुमारास पुढे चालायला सुरवात केली. येथून पुढे खाली झाडांमध्ये उतरणाऱ्या पायवाटेने आम्ही पठाराकडे आगेकूच केली . सूर्यदेव आपल्या full capacity ने तळपत होते  पण झाडीत घुसल्याने मामला जरा बरा होता.



पठारावर आल्यावर दरीच्या कडेकडेने जाणारी एक पुसटशी पायवाट पकडून Traverse मारायला सुरवात केली. मधेच झाडी मधेच मोकळं पठार असा उन-सावलीचा खेळ सुरू झाला.

पाणी सुद्धा संपत आलं होता आणि पुढच्या नळीत पाणी लागणार हे माहीत असल्याने Traverse वर पाणी प्यायच कटाक्षाने टाळत होतो.

पण म्हणतात ना " भगवान के घर देर है, अंधेर नही " तसं आम्हाला एक शेवाळयुक्त पाण्याच डबक दिसलं




आमच हिरवगार/ काळ ?? डबक.....

मग काय विचारता......डबक अर्ध रिकामी होईपर्यंत पाणी प्यायलो. रिकाम्या बाटलीत हिरवगार पाणी भरून घेतलं आणि हात-तोंड धुवून परत वाटेला लागलो.

हे म्हणजे "127 Hours " या चित्रपटचा देशी अवतार आहे असं मला वाटायला लागलेल.




युही चला चल राही.....

पुढे गेल्यावर लांबवर नेढ्याच आणि बालेकिल्ल्याच दर्शन झालं आणि सोबतच जोरजोरात ढगांचा गडगडाट कानावर पडला.


कॅमेरा बॅगेत ठेवेपर्यंत अंगावर टपोरे थेंब बरसू लागले. उन निवळून अचानक ढगाळ वातावरण झालं. तापलेल्या मातीवर आणि वाळलेल्या गवतावर झालेल्या वरुणराजाच्या शिडकाव्याने एक वेगळाच गंध हवेत दरवळला.

**मनात म्हटलं “ एक तुझीच कमी होती , तू पण मनसोक्त पड फक्त आम्हाला नीट गडावर पोहोचू दे ...!! ”**




अचानक ढग दाटून आले.....


© Sankalp Chaudhari


© SANKALP CH


© SANKALP CI


© SANKALP CHAUDHARI

पण आमचं सुदैव की पाऊस थोड्याच वेळात थांबला.एव्हाना संध्याकाळचे ४:०० वाजत आले होते.

**वेळ थोडा होता, पाणी पण थोडसच (चौघात २.५ लि. फक्त) होतं पण लक्ष्य मात्र मोठ होतं.**

परंतु अश्या महत्वाच्या क्षणी आमचे दुर्दैव आमच्या आड आले. मी, गौतम आणि पंकज तिघेजण Traverse आणि दुसऱ्या नळीच्या Junction पर्यंत आलो. हा आमच्या दुसऱ्या नळीचा starting पॉइंट होता.

सर्वात मागून येणारा अमोल मागे पडलेला. वाट जास्त कठीण नसल्याने तो मागून येईल अशा अंदाजाने आम्ही starting पॉइंटला टॉनिक चाटत बसलो होतो.



५ मिनिटे झाली, १० मिनिटे झाली  शेवटी १५ मिनिटे झाली ........ तरी अजून अमोलचा पत्ता नाही म्हटल्यावर आम्ही समजून गेलो की हा भाऊ मागच्यामागे कुठेतरी भरकटलाय. **#_नको_तिथे_कडमडतय_बेनं.**

मग काय.......भौसाहेबांसाठी Rescue Operation सुरू झाले. सुरवातीला हाका मारून पहिल्या पण काही प्रतिसाद येत नव्हता, यामुळे आमची अस्वस्थता अजूनच वाढत होती.

शेवटी पाचेक मिनिटांनी आमच्या हाकेला अमोलचा वरुन कुठून तरी बारीकसा reply आला. यामुळे थोडा मागे जाऊन त्याला " वर जाऊ नकोस ", " खाली येऊन सरळ वाटेने चालत रहा " अशी सूचनात्मक मदत सुरू केली आणि अचानक थोड्यावेळाने हाशहुश करत आमचे "भौ" झाडीतून वाटेवर अवतीर्ण झाले.

**या सगळ्यात आमची अतिमौल्यवान अशी ४० मिनिटे वाया गेली....** ☹☹

आमच्या वेळापत्रकानुसार संध्याकाळी ५:०० वाजता दुसरी नळी पार करून ६:०० वाजता सूर्यास्त बघण्यासाठी कोकणकड्यावर आम्हाला पोहोचायचे होते, परंतु **पहिल्या नळीतला rock patch आणि अमोलभौ ची नवा रस्ता शोधमोहीम आमच्या चांगल्याच पथ्यावर पडली होती.**

वेळ संध्याकाळचे ४:४०....... अमोलवर वैतगल्याने तिरीमिरीतच कम्माला फोन ( स्पीकरवर ) लावला :

कम्मा : हॅलो, कोण बोलतय ??

मी : हॅलो कम्मा, मी संकल्प बोलतोय.

कम्मा : हा बोला...कुठवर पोचले तुम्ही ?

मी : अहो आम्ही आता दुसऱ्या नळीच्या पायथ्याशी आहोत, इकडून नळी पार करायला अजून किती वेळ जाईल ??

कम्मा : तरी बगा......इकडून तुम्हाला पटापट गेलात तर तास-दीड तास लागतोय बघा.

बास्स.....कम्मा शेवटचं वाक्य म्हणाला आणि आमच्या अंगातल उरलासुरलं त्राणही निघून गेलं. **आधीच आमची हवा निघून गेलेली त्यात " पटपट गेलात तर तास-दीड तास " म्हणजे आमच्या सद्यस्थितीतल्या वेगानुसार २ ते २.५ तास नक्कीच हे आम्ही समजून चुकलो.**

**वेळ ४:४५ मि. बालेकिल्ल्याची दुसरी नळी चढायला आम्ही सुरवात केली. पाणी पुर्णपणे संपलेल ( हिरवागार पाणी सुद्धा ), चौघेही प्रमाणाच्या बाहेर थकलेलो, पाय शरीराची साथ देत आहेत की नाही याची काही जाणीव नाही, चालण्यासाठी अंगात जीव असला पाहिजे म्हणून जबरदस्तीने पोटात ढकलली जाणारी बिस्किटे आणि तहानेने व्याकूळ झालेला जीव असा सगळा लवाजमा आम्ही केवळ गड सर करण्याच्या इच्छाशक्तीने ओढत होतो.**

नळीतले मोठमोठाले दगड आमचा अंत बघत होते. **कसही करून अंधार पडायच्या आत वरच्या वाटेवर पोचल पाहिजे कारण अंधार पडल्यावर अजून गोची होणार हे मी पक्क जाणून होतो.**

वाटेत ५ मिनिटांसाठी ब्रेक घेतला, तोपर्यंत गौतमने एका दगडाच्या खोबणीत भुसभुशीत मातीत खड्डा करून मातीयुक्त पाणी बुचाने बाटलीत भरण्याचा उद्योग सुरू केला. आम्ही ते जमा केलेल मातकट पाणी  बाटलीच्या तोंडावर t-shirt लावून त्यातून अक्षरशः शोषून घेत होतो. याचा परिणाम म्हणजे आमचा ब्रेक १५ मिनिटे लांबला.

सूर्य कलतीला लागलेला. आमचा कड्यावरून सूर्यास्त वगैरे सगळं बोंबललं होतं त्यामुळे बसल्या जागी सूर्यनमस्कार (i mean सूर्याला नमस्कार ) घातला.

**आता फक्त २०-२५ मिनिटांचा खेळ होता....की मग रात्रीचा अंधार सह्याद्रीला विळखा घालणार होता !!.**



तशाच परिस्थितीत आम्ही निघालो, आता शेवटचे १०-१५ फूट बाकी होते परंतु नळीतून पुढे जायचा मार्ग गचपणामुळे ( दाट झाडी ) बंद झाला होता.

नळीच्या उजव्या हाताने थोड्याश्या घसाऱ्यावर (scree) एक खोबण होती तिच्यातून वर जाता येते का हे पाहण्यासाठी मी rope घेऊन स्वतःला सांभाळत खोबणीत जाऊन पोचलो. पण इकडूनसुद्धा पुढे परत घसारा असल्याने मार्ग बंद होता.

तोवर पंकज माझ्या मागून खोबणीत आला आणि वरती कुठे वाट सापडते का हे बघण्यासाठी हळू हळू वर गेला. मी इकडे तोवर बाकी दोघं आणि बॅगा वर घेण्यासाठी कमरेला rope गुंडाळून खाली सोडला.

**तेवढ्यात मी पंकजला वर वाट मिळाली का ? असं विचारलं त्यावर होकारार्थी उत्तर मिळालं आणि मला माझी चूक लक्षात आली (जी खरतर मला ट्रेक नंतर उमगली).**

ती चूक अशी की मी पंकजला त्याच वेळी ropeचा एक छेडा घेऊन वर पाठवला पाहिजे होतं ज्यायोगे आम्ही सगळे नंतर घसऱ्यावरून सहज वर पोहोचू शकलो असतो. पण आमच्या नशिबात त्यादिवशी काहीतरी  भन्नाटच होणार असं लिहलं असणार.

एकीकडे  मी बाकीच्या दोघांना वर घेण्याचा प्रयत्न करत होतो पण अतिथकव्यामुळे मी rope पकडून ठेवू शकत नव्हतो. पंकजने माझ्या मदतीला यावं म्हणून गौतम खालून पंकजला आवाज देऊ लागला पण पंकज scree च्या भीतीने खाली यायला टाळाटाळ करू लागला.

याची परिणती म्हणजे दोघेही एकमेकांबद्दल प्रशंसनीय गौरवोद्गार काढू लागले...... कोणीच मागे हटत नव्हतं पण शेवटी गौतमने खूपच गौरव केल्याने पंकज हळूहळू खाली उतरला.  या गडबडीत एक छोटा दगड खाली जाऊन गौतमच्या खांद्यावर लागला......आता काय ?? अजून गौरव....... :D

मी आणि पंकजने मिळून दोघांना वर घेतलं. सगळीकडे काळोख पसरला होता. चांदण्यात सगळ धूसर दिसत होतं, बरं खोबणीत चौघेही आल्याने वळून बॅगेतून टॉर्च पण काढता येत नव्हता. त्यामुळे अमोलने काढलेल्या एकुलत्याएक टॉर्चच्या उजेडात सगळं operation सुरू होतं.

वर असलेल्या वाटेपर्यंत जाता येतय का ? हे बघायला गौतम वर निघाला पण ५-७ पावला जात नाही तो घसरत घसरत खाली आला आणि सोबत डावा पाय पण सोलवटून घेतला.

वाट वर असून जाता येत नव्हतं, पुर्णपणे अडकल्याची जाणीव सगळ्यांनाच झाली त्यामुळे on the spot चर्चा करून रात्रभर गचपणाखालील खोबणीत काढून सकाळी रस्ता शोधण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार गौतमला आधी खाली सोडल. त्यानंतर सगळ्यांचे कॅमेरे एका बॅगेत टाकून, ती बॅग पाठीवर मारुन अमोलला अर्ध्या patch वर उभं केलं.

माझ्याकडून अमोलकडे आणि तिकडून खाली गौतमकडे अशा आमच्या बॅगा खाली भिरकावल्या. अमोल नंतर पंकज खाली गेला आणि शेवटी rope सकट मी वरती राहिलो.

गौतमने खाली उतरताना दगडातली एक खाच हेरून ठेवलेली. तिच्यातून U टाकून दूसरा छेडा अमोल कडे सोडला. एक छेडा गौतम आणि बाकीच्यांनी घट्ट पकडून ठेवला आणि दूसरा छेडा पकडून मी खाली उतरू लागलो.

खाली एका दगडाचा सपोर्ट होता तो टॉर्चच्या उजेडात गौतमने मला दाखवला आणि त्यावर पाय देऊन मला उतरायला सांगितले, पण माझ्या आधी उतरलेल्या heavyweights मुळे मी जसा त्या दगडावर पाय टाकला, तो दगड तुटला आणि मी घरंगळत खाली जाऊ लागलो.

त्यातल्यात्यात एका हाताने rope पकडून ठेवण्याच्या प्रयत्नात हात चांगलाच काचला. दुसऱ्या हाताने एक दगड पकडून माझी घसरगुंडी  थांबवली आणि परत वरती आलो.

यानंतर बॅगा नळीत व्यवस्थित रचून आम्ही चौघे दाटीवाटीने नळीत बसलो. बसल्या बसल्या सगळ्यांना पेंग येत होती. एव्हाना रात्रीचे ८:३० वाजून गेले होते.  अचानक मेसेज आल्यामुळे गौतमचा मोबाइल वाजला.

वीजेवाणी कल्पना डोक्यात सळसळली आणी एक अखेरचा प्रयत्न म्हणून कम्माला फोन लावला. गम्मत अशी की नळीत आत घुसल्यावर नेटवर्क जात होतं म्हणून नळीच्या तोंडावर उभ राहुन आणि हात अजून बाहेर काढून स्पीकर फोन सुरू केला.

मी : हॅलो, कम्मा मी संकल्प बोलतोय.

कम्मा : आवं हा, बोला बोला... कवाधरनं तुम्हासनी फोन करत व्हतो, लईच काळजी लागून राहिलेली तुमची.

मी : अहो आम्ही आता नळीच्या टोकापासून १० फूट खाली अडकलोय आणि इथून पुढे जायला वाट नाही मिळत आहे

कम्मा : आवं  तुम्ही एक काम करा, उजव्या हाताला कारवी दिसतेय का तुम्हाला ??

मी : हा दिसतेय.

कम्मा : तिथून झाडीत घुसा आणि तसच जरा पुढं जाऊन कातळवरून वर चढा.

मी : कम्मा आधीच अंधारात नीट काही दिसत नाही आहे, त्यात कुठे भलतीकडे पोचलो तर अजून problem व्हायचा......मलाच आता confidance नाही आहे.

कम्मा : बरं पाणी आहे का तुमच्याकडे शिल्लक ???

मी : अहो नाही हो, पाणी पण संपलय आमच्याकडल.

कम्मा : बरं बरं मग तुम्ही आहात तिकडेच थांबा, मी कोणाला तरी पाठवतो. पण त्यांना तास-दीड तास लागेल यायला.

मी : हा चालेल, फक्त त्यांना २-३ लिटर पाणी आणायला सांगा.

मी : बरं मी काय म्हणतोय, इकडे काही जनावरचा (वाघ, बिबट्या) धोका बिका नाही ना...???

कम्मा : न्हाय न्हाय तिकडं जनावरचा वगैरे काही धोका नाही.

कम्मा : बरं मी ठेवतो पण तुम्ही फोन चालू ठेवा.

मी : हा ठीक आहे.

यानंतर थोड्या वेळानी श्री.सावळाराम भादड यांचा फोन आला आणि त्यांनी ते आम्हाला घ्यायला येत असल्याच कळवल.

ते ऐकून आमचा जीव भांड्यात पडला. **कम्मानी जनावराचा काही धोका नाही अस सांगितलं होतं, तरी साप किंवा विंचू यांची भीती तर होतीच मनात.**

खोबणीत तसचं बसल्या बसल्या डोळे मिटत होते, किती वेळ पेंगत होतो माहीत नाही. अचानक वरुन प्रकाश आला आणि सोबत हाका पण ऐकू आल्या. **सावळाराम नळीच्या वर येऊन पोचला होता.** आम्ही पण त्यांना खालून प्रतिसाद दिला. गचपणातून येणं शक्य नसल्याने त्यांनी पण पुढून येतो असं सांगितलं.

ते दोघे उजवीकडून खाली येत असताना आम्ही आमच्या कडील टॉर्चच्या सहाय्याने त्यांना signal देत होतो. थोड्याच वेळात साळवे आणि त्याचा जोडीदार कारवी मधून आमच्या समोर आले.

आल्या आल्या गौतमने पहिले त्यांच्याकडे पाणी मागितलं. उत्तरादाखल त्यांनी सोबत आणलेली पाण्याची बाटली पुढे केली. **कोरड्या पडलेल्या घशाला थंडगार पाण्याचा स्पर्श होताच पाण्याला अमृत का म्हणतात ?? याची प्रचिती आम्हास आली.**

घडलेले रामायण साळवेला संगितले. मधेच त्या दोघांचा आम्हाला वर कुठून घेऊन जायचं याबाबत discussion सुरू होतं. शेवटी ते जसे आलेले त्याच मार्गाने आम्हाला वर घेऊन जायचं ठरवलं. आम्ही पण मग आमचं चंबूगबाळं उचललं आणि त्यांच्या मागून कारवीत घुसलो.

पाचच मिनिट चालल्यावर आम्ही एका एकदम सोप्या patch जवळ आलो आणि तो पार करून मुख्य वाटेवर पोचलो. वाटेपासून इतक्या जवळ असून पण आम्ही अडकून बसलो......

## So close yet so far

मुख्य वाटेला येईपर्यंत रात्रीचे ११:०० वाजले होते. इथून पुढे रस्ता माहीत असल्याने आम्ही सगळे बिनधास्त चालत होतो. बालेकिल्ला उतरून वाट टोलारखिंडीच्या वाटेला मिळाली. मोकळ्यात आल्यावर तसच वाटेत बसून जरा आराम केला.

**साळवेनी त्यांच्याकडे जेवण तयार असल्याची खुशखबर देऊन “ साड्डा दिल खुश कर दित्ता ”.**

सुमारे तासभर चांदण्यातून चालत चालत आम्ही रात्री १२:०० च्या सुमारास मंदिरात येऊन पोचलो.

देवळात झोप न आल्याने भटकणारे काही जण भेटले. इतक्या रात्री सामनासकट प्रकटल्याने आमची चौकशी करत होते ☺☺

काही गुहांमधून पिकनिकछाप पब्लिक मोठमोठ्याने गाणी गात होते त्यामुळे अजूनच वैतागल्यासारखा होत होतं.

रात्रीच्या अंधारातच भगवंताला नमस्कार केला आणि मनसोक्त पाणी पिऊन घेतले. जीव थंड झाल्यावर रमतगमत कड्यावरच्या साळवेच्या झोपडीकडे गेलो. झोपडीत पोचल्यावर अंगावरच ओझं दूर करून जमिनीवरच फतकल मारली.

थोडा वेळ आराम करून चहा घेतला आणि जेवायला बसलो. दुपारचे उरलेले ठेपले, वरण, भात आणि सोयाबीनची भाजी असा मस्त बेत होता. पोटभर जेवणानंतर झोपडी बाहेर उघड्यावरच carrymat अंथरली आणि १५ तासांच्या अविश्रांत मेहनतीने थकलेला देह त्यावर सोडून दिला.

**केव्हा झोप लागली समजलसुद्धा नाही !!!**

**दिनांक १६ मार्च २०१४**

सकाळी सोसाट्याचा वारा सुटला होता. आम्ही लोळत लोळत भरकटल्यामुळे carrymat वाऱ्यासोबत फडफडत होती. सकाळचे ६:३० वाजत होते, ग्रुप्स हळू हळू कड्यावर दाखल व्हायला सुरवात झाली होती.

गार वाऱ्यामुळे साळवे कडे चहा घ्यायला सगळेच थांबत होते आणि त्यांच्या चिवचिवाटामुळे चांगलीच झोपमोड होत होती. शेवटी ७:०० वाजता उठलो. पंकज आणि अमोलला उठवलं. तोंड धुवून चहा घेतला, रात्री उशिरा केलेल्या जेवणामुळे भूक फारशी जाणवत नव्हती.

तसाच कॅमेरा घेऊन कोकणकड्यावर गेलो. कडा आणि कड्यावर लावलेला भगवा पाहून मनोमन सुखावलो.



कडा फिरताना कै. श्री अविनाश बर्वे यांच्या नावच्या पाटीची झालेली भग्नावस्था पाहून मन विषण्ण झाले.



भग्न अवस्थेतील पाटी.....

तास दोन तास कड्यावर घालवून आम्ही परत फिरलो. झोपडीत परत आल्यावर कांदेपोहयांवर ताव मारला. कम्माला फोन करून खुशाली कळवली आणि सावळारामचे अडल्या वेळेला धावून आल्याबद्दल आभार मानले आणि परतीच्या प्रवासाला लागलो.

आदल्या ट्रेक्स मध्ये तारामती वगैरे पॉईंट्स बघितल्याने ते न बघता केदारेश्वरला पाण्यात डुबकी मारून निघायचे ठरवले. तिकडे पोचलो आणि गुहेतील पाणी बघून त्यात उतरण्याचा बेत रद्द केला. महाशिवरात्री निमित्त आलेल्या भक्तांनी गुहेतल्या पाण्याची वाट लावून टाकली आहे.

पाणी पुर्णपणे काळं झालं असून त्याला नाल्यातला पाण्यासारखा घाण वास येत होता. यामुळे परत मंदिरात येऊन तिकडे आंघोळ केली.



आंघोळ करून फ्रेश झाल्यावर मंदिरासमोर ट्रेकमधला एकुलताएक ग्रुप फोटो काढला.




**रात्री जे दिसलं नव्हतं ते म्हणजे गडाचं झालेलं विद्रूपिकरण. यात मोलाचा वाटा उचललेला तो म्हणजे “वाघेश्वर ग्रुप, खेड” यांनी.** कोकणकड्यापासून ते थेट टोलारखिंडीतल्या वाघशिल्पापर्यंत सर्वठिकाणी ठळक अक्षरात आपले नाव लिहून ठेवले आहे.

गडावरुन आम्ही जे सुसाट निघालो ते थेट टोलारखिंडीतल्या वाघशिल्पाजवळ थांबलो. तिकडे अर्धा तास थांबून पाण्यासोबत Parle-G आणि इतर खाऊ हादडला.

मी आणि गौतम वेगाने खाली उतरत आतापर्यंत उतरण्याची विक्रमी वेळ नोंदवत मधल्या अर्ध्या तासाचा ब्रेक पकडून फक्त २ तासात खाली उतरलो. खाली पोचून पंकज आणि अमोलची वाट पाहत बसलो होतो पण त्यांनी परत एकदा आपल भौगोलिक ज्ञान पाजळल्याने रस्ता चुकले आणि खिरेश्वर गावातील शाळेच्या पुढून कुठूनतरी बाहेर पडले.

यापुढे सरळ धरणाच्या भिंतीवरून चालत highway कडे निघालो. जाताना नागेश्वरच्या मंदिरात गेलो. खिरेश्वर गावातून अदमासे एक कि.मी अंतरावर खिरेश्वराचे प्राचीन शिवमंदिर आहे. हे मंदिर अकराव्या शतकातील यादवकालीन मंदिर आहे. मंदिराच्या बाहेरील सभामंडप छताला शिल्प पट्टीका बसवलेली आहे.

आतील गाभाऱ्याच्या दाराच्या चौकटीवर शेषशायी विष्णू व परिवाराचे अप्रतिम कोरीव शिल्प आहे. मूषकवाहन गणेशगणेशानी ,वृषभवाहक शीवपार्वती , हंसवाहन ब्रह्म सरस्वती, मयूरवाहन स्कंदषष्टी, नरवाहन कुबेरकुबेरी, मकरवाहन मकररति, अशा अनेक कोरीव प्रतिमा येथील पाषाणावर आढळतात.






© Sankalp Chaudhari












मंदिरातून बालेकिल्ला आणि नळी स्पष्ट दिसत होती. काल याच नळीत आम्ही सगळे अडकून पडलो होतो.







मंदिरातून बाहेर पडल्यावर तिकडून जवळच असलेल्या लेण्यांमध्ये गेलो.




लेण्यांमध्ये विशेष काही बघण्यासारखे नाही आहे. समोर मंडप असून त्यात १२ खांब आहेत. मंडपाच्या उजव्या हाताला एक खोली आहे. लेणी पाहून परत धरणाच्या वाटेवर आलो आणि हळूहळू Highway गाठला.






© Sankalp Chaudha

सुदैवाने highway ला आल्या आल्या लगेच परतीची एसटी मिळाली.

सूर्य पुन्हा अस्तास जायची तयारी करत होता. काहीतरी अकल्पित केल्याची भावना मनात होती , पाय घराच्या वाटेकडे लागलेले पण मन मात्र अजूनही हरिश्चंद्रावर रेंगाळत होतं.....



## कसे पोहोचाल :

### खिरेश्वर गावातून :

सर्वात प्रचलित असणारी वाट ही खिरेश्वर गावातून गडावर येते. या वाटेने येण्यासाठी पुण्याहून आळेफाटा मार्गे अथवा कल्याणहून मुरबाड-माळशेज घाट मार्गे खुबी फाट्यास उतरावे. खुबी फाट्यावरून धरणावरून चालत गेल्यावर, ५ कि.मी अंतरावर खिरेश्वर गाव लागते.

या गावातून दोन वाटा गडावर जातात. अ) एक वाट ही टोलार खिंडीतून गडावर सुमारे ३ तासात हरीश्चंद्रेश्वर मंदिरापर्यंत पोहचते. टोलार खिंडीत वाघाचे शिल्प पाहायला मिळते. ब) दुसरी वाट ही राजदरवाजाची वाट आहे. ही वाट पूर्वी प्रचलित होती. आता मात्र वाटाड्याशिवाय या वाटेने गडावर जाऊ नये. या वाटेने आपण गडाच्या जुन्नर दरवाज्यापाशी पोहचतो. या मार्गाने जाताना गावातील विहिरीतून पाणी भरून घेणे आवश्यक आहे, कारण वाटेत कुठेच पाणी मिळत नाही.

## नगर जिल्ह्यातून ( पाचनई मार्गे) :

हरिश्चंद्रगडावर जाण्याची एक वाट ही नगर जिल्ह्यातून आहे. यासाठी मुंबई - नाशिक हमरस्त्यावरील घोटी या गावी उतरावे. तिथून संगमनेर मार्गावरील राजूर या गावी यावे. पाचनई हे गडाच्या पायथ्याचे गाव असून येथून गड गाठण्यास सुमारे ३ तास लागतात. वाट फारच सोपी आहे. पाचनई ते हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर हे अंतर सुमारे ६ किमी आहे.

## सावर्णे - बेलपाडा - साधले असा घाटमार्ग :

मुंबई - माळशेज मार्गावर माळशेजघाट चालू होण्यापूर्वी सावर्णे गाव आहे. सावर्णे गावातून बेलपाडा गावात जाण्यासाठी फाटा फुटतो. या फाट्यावरून २ - ३ किमी गेल्यावर उजव्या हाताला जाणाऱ्या रस्त्याने बेलपाडा गावात पोहोचता येते. मुंबई - माळशेज रस्त्यावरून बेलपाड्या पर्यंत पायी चालत जाण्यास दिड ते दोन तास लागतात. बेलपाडा गावातून साधले घाट मार्गे हरिश्चंद्रगडावर जाता येते.

परंतु हा मार्ग फारच अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असलेल्यांनीच हा मार्ग अवलंबावा. येथून बेलपाडा या कोकणकड्याच्या पायथ्याच्या गावात यावे. येथून कड्यातून काढलेल्या साधले घाटाच्या सहाय्याने कोकणकड्याच्या पठारावर जाता येते. या वाटेने मंदिर गाठण्यास सुमारे १० ते १२ तास लागतात.

## प्रचलित डाव्या नळीची वाट :

नळीच्या वाटेने जाण्यासाठी बेलपाडा या कोकणकड्याच्या पायथ्याच्या गावात यावे. बेलपाडा गावातून कोकणकड्याच्या दिशेने चालत जाऊन ओढा पार करावा लागतो. ओढा पार केल्यावर वाट कोकणकडा व बाजूचा डोंगर यांच्या मधल्या अरूंद घळीतून वर चढत जाते.ही वाट फारच अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असलेल्यांनीच हा मार्ग अवलंबावा. या मार्गाने कोकणकड्याच्या पठारावर जाण्यास सुमारे ८ ते १२ तास लागतात.

### रोहिदास नळीची वाट :


या नळीच्या वाटेने जाण्यासाठी बेलपाडा या कोकणकड्याच्या पायथ्याच्या गावात यावे. बेलपाडा गावातून कोकणकड्याच्या दिशेने चालत जाऊन कड्याजवळील उजव्या नळीत शिरावे. नळी पार केल्यावर सुमारे ८०० ते १००० फूट खाली उतरून पठारावर यावे. इकडून पुढे बालेकिल्ल्यापर्यंत traverse लागतो. पुढे बालेकिल्ल्याच्या अलीकडील नळीतून आपण गडावर पोहोचतो. ही वाट फारच अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असलेल्यांनीच हा मार्ग अवलंबावा. या मार्गाने कोकणकड्याच्या पठारावर जाण्यास सुमारे १० ते १५ तास लागतात.

## अविस्मरणीय क्षण :

- रात्रीच्या चांदण्यातला ११ किमी चा मॉर्निंग वॉक.
- Rock Patch वरची धडपड.
- दुसऱ्या नळीत प्यायलेलो मातकट पाणी.
- कोकणकडा.
- सावळाराम कडील रात्रीचे जेवण.

## हरिश्चंद्रगडचे  भटके:

- संकल्प चौधरी.
- गौतम वैष्णव.
- अमोल भंवरी.
- पंकज वाडेकर.



# समाप्त

